Vol-13 Special Issue- 2.1 ISSN- 2349-7076

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter)
Patron: Prof. R. G. Kothari
Chief Editor: Prof. Jignesh B. Patel
Email:- Mo. 9429429550 ctefeduinspire@gmail.com

# महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी नेतृत्व क्षमता चाचणी विकसित करुन त्या आधारे विद्यार्थ्यांची, भावनिक परिपक्वता आणि कौटुंबिक वातावरण यातील सहसंबंधाचा अभ्यास.

**प्रा. डॉ.अनिल देवराव वरघट**
मार्गदर्शक
शासकीय अध्यापक महाविद्यालय, बुलढाणा

**आनंदा हरिश्चंद्र डोंगरे**
संशोधक विद्यार्थी
शासकीय अध्यापक महाविद्यालय, बुलढाणा

## सारांश

आधुनिक काळामध्ये शिक्षण देण्यासाठी जास्तीत जास्त भर हा शाळेवर आहे. पूर्वीच्या काळात शिक्षणासाठी शाळा उपलब्ध नव्हत्या. गुरुकुलामध्ये जाऊन शिक्षण घ्यावे लागत असे. शिक्षणावर फक्त उच्च वर्गीयांचाच अधिकार होता. परंतु काळानुरुप अनेक बदल होत जाऊन सर्वांसाठी शिक्षणाच्या सोयी उपलब्ध झाल्या. शिक्षण हा प्रत्येकासाठी आवश्यक घटक झाला. त्यासाठी अनेक शाळा उपलब्ध आहेत. शिक्षण घेत असतांना अनेक घटकांचा समावेश होत असतो, त्यामध्ये भावनिक बुध्दीमत्ता, परिपक्वता सारखे घटक असतात. तसेच परिपक्वता हे एक खेळ नसून ती एक विद्यार्थी जीवनातील महत्वाची गरजच आहे आणि शिक्षणाची ध्येय साध्य करण्याचे एक अमोघ साधन आहे. विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्वाचा सर्वांगीण विकास घडवून आणण्याच्या दृष्टिने जी अनेक प्रकारची उद्दिष्टे आहेत त्यातील बरीचशी उद्दिष्ट वर्ग अध्यापन पध्दतीतून साध्य होवू शकत नाहीत.आजच्या युगात सगळ्याच क्षेत्रात तीव्र स्पर्धा आहे. शैक्षणिक संपादन हे फारच महत्वाचे झालेले आहे. त्यानुसारच शिक्षणाची आणि आयुष्याची दिशा ठरते. म्हणूनच अभ्यास करणे अतिशय महत्वाचे झालेले आहे. यासाठी प्रथम विद्यार्थ्याला अभ्यासात रस असणे अत्यंत महत्वाचे आणि जरुरीचे आहे. विद्यार्थ्यांनी नेहमी मनात एक सकारात्मक आशावादी वृत्ती जोपासावी व त्याला अभ्यासात कितपत यश हवे आहे याची स्पष्ट कल्पना प्रथम त्याच्या मनात ठाम असावी लागते. अभ्यासाचे वर्णन करतांना, अभ्यास हा आनंद निर्मीतीसाठी असतो तो अलंकाराप्रमाणे भूषनभूत होतो आणि तो कर्तबगारीला पोषक ठरतो त्यासाठी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आजच्या युगात विद्यार्थ्यांना परिपक्वता अध्यापन आवश्यक घटक बनला आहे.

## भावनिक परिपक्वता

व्यक्तीचा निरोगी भावनिक विकास हा त्यांच्या भावनिक परिपक्वतेमध्ये रुपांतरीत होतो. भावनिक परिपक्वता ही व्यक्तीकडुन आपल्या विशिष्ट वयानुसार करण्यात येणा-या क्रियाप्रतीक्रियांच्या प्रक्रियांशी संबंधीत आहे.परिपक्वतेमध्ये कोणतेही एक वैशिष्ट्य नाही की, ज्याद्वारे परिपक्वतेला पूर्णपणे सर्वांग स्वरुपता स्पष्ट केल्या जाऊ शकते. व्यक्तीचा विकास हा बालपणापासुन तर प्रौढावस्थेपर्यंत सातत्याने होत असतो. व त्यानुसार व्यक्तीच्या भावना, भय, व्देश क्रोध, तिरस्कार, आपुलकी, आनंद या बाबी व्यक्तीला वयापासुन होणा-या विकासाबरोबरच वर्गीकृत होत जातात. ज्या व्यक्तीचा विकास अशा प्रकारच्या

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter) Email:- ctefeduinspire@gmail.com

भानानाप्रधान वातावरणामध्ये होतो त्या व्यक्ती आपल्या जीवनामध्ये योग्यप्रकारे समायोजन प्रस्थापित करतात आणि त्याचे समायोजन हे सामाजिकदृष्टया आणि वैयक्तिकदष्टया चांगल्या प्रकारे समाजामध्ये स्विकृत होते. व्यापक अर्थाने विचार केल्यास, भावनिक परिपक्कता म्हणजे ज्या व्यक्तीने समृध्दतेसाठी त्यांच्या क्षमतांचा विकास अथवा प्रगती केली आहे. आणि त्याच्यामध्ये त्या विविध बाबी जसे प्रेम प्रकरणे, हसणे, मानसिक दु:ख एखाद्या परिस्थितीचा सामना करताना निर्माण होणारा क्रोध दर्शवण्याची क्षमता इत्यादीचा आनंद घेण्याची क्षमता असते. एखाद्या परिस्थितीमध्ये क्रोध निर्माण झाल्यास त्या क्रोधावर नियंत्रण ठेवणे आणि त्यातून मार्ग काढण्यासाठी प्रयत्न करण्यात येतात. क्रोध निमार्ण झाल्यास कोणत्याही व्यक्तीचा राग वाढु शकतो आणि भिती निर्माण होण्याची भीती निर्माण होण्याची स्थिती त्यामुळे वाढु शकते अशा स्थितीत क्रोध आणि रागावर नियंत्रण ठेवुन आवश्यकतेनुसार त्यासंदर्भातील परिपक्क व्यक्तीची ओळख आहे. भावनिक परिपक्कता ही व्यक्तीच्या व्यक्तीमत्वाचा परिणामकारक निर्णायक घटक नाही परंतु व्यक्तीचे व्यक्तीमत्व हे किशोवयीन मुलांच्या विकासावर नियंत्रण ठेवण्यास मात्र मदत करते. कोणत्याही पातळीवर परिपक्क भावनिक वर्तन हे व्यक्तीच्या सामान्य विकासाच्या प्रक्रियेला प्रतिबिंबीत करते. जो व्यक्ती आपल्या स्वत:च्या भावना नियंत्रणात ठेवतो तो व्यक्ती भावनांवर दिर्घकालीन नियंत्रण टाळण्यात अयशस्वी होत नाही आणि एका विशिष्ट अवस्थेनंतर स्वत:ची दयनीय स्थिती आणि सहन करण्याची शक्ती त्याच्यामधुन संपून जाते तरी सुध्दा ती व्यक्ती भावनिकदृष्ट्या स्तब्ध राहते. वॉल्टर एट अल 1976 यांच्या मते भावनिक परिपक्कता अशी प्रक्रिया आहे. ज्यामध्ये व्यक्तीमत्व भावनिक आरोग्याच्या प्रभावी विकासासाठी होणा-या प्रयत्नामध्ये सातत्याने भर घालते त्यामुळे शारिरीक आणि आंतरिक व्यक्तीमत्वाचा चांगला विकास होतो. भावनिक परिपक्कतेचे सर्वांत उल्लेखनीय वैशिष्ट्य म्हणजे ताण सहन करण्याची व्यक्तीची क्षमता होय. भावनिक परिपक्कता म्हणजे अपरिहार्यपणे निर्माण होणा-या चिंता किंवा कौशल्याला उत्तेजन देणा-या सर्व अटींचे निराकरण करणे नव्हे तर हा दृष्टीकोण सातत्याने समोर ठेवणे आणि त्यानुसार भावना आणि वैचारिक स्वस्थ एकात्मता प्रस्थापित करण्यासाठी वाटचाल करणे आवश्यक असते.

## कौटुंबिक परिस्थीती

विद्यार्थ्यांच्या घरातील एकंदरीत संपूर्ण परिस्थीती म्हणजे त्याची कौटुंबिक परिस्थीती होय. त्यांच्या घरातील त्याचे आई-वडिल, भावंडे, शैक्षणिक वातावरण, आर्थिक परिस्थीती या सर्व घटकांचा प्रभाव विद्यार्थ्याच्या व्यक्तिमत्व विकासावर होतांना दिसतो. काही विद्यार्थ्यांची कौटुंबिक परिस्थीती फार चांगली असते तर काही विद्यार्थ्यांची कौटुंबिक परिस्थीती फार हालाखीची दिसते, काही विद्यार्थ्यांच्या कुटूंबामध्ये शिक्षणाचा लवलेशही नसतो तर काही विद्यार्थ्यांच्या कुटूंबामध्ये शिक्षणाच्या चार ते पाच पिढया हया बाहेर निघालेल्या असतात, त्यामुळे कौटुंबिक परिस्थीती ही विद्यार्थ्याच्या व्यक्तिमत्व विकासातील एक महत्वपूर्ण घटक आहे.अध्ययन -अध्यापन प्रक्रिया ज्यासाठी घडते तेथील विदयार्थी वेगवेगळया परिसरातील असतात त्यांचे अनुभव, त्यांना मिळालेले वातावरण यातही फरक असतो व त्या घटकांचाही परिणाम अध्ययनावर होते.

**मुख्य शब्द :** नेतृत्व क्षमता चाचणी,विद्यार्थ्यांची भावनिक परिपक्कता आणि कौटुंबिक वातावरण यातील सहसंबंधाचा अभ्यास.

**संशोधन निबंध शीर्षक:-** महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी नेतृत्व क्षमता चाचणी विकसित करुन त्या आधारे विद्यार्थ्यांची, भावनिक परिपक्कता आणि कौटुंबिक वातावरण यातील सहसंबंधाचा अभ्यास.

## संशोधन निबंध विषयाची उद्दिष्टे:-

महाविद्यालयामधील विद्यार्थ्यांची नेतृत्व क्षमता शोधण्यासाठी नेतृत्व क्षमता चाचणी विकसित करणे.

महाविद्यालयामधील विद्यार्थ्यांच्या नेतृत्व क्षमताचा अभ्यास करणे.

महाविद्यालयामधील विद्यार्थ्यांच्या भावनिक परिपक्कतेचा शोध घेणे.

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter) Email:- ctefeduinspire@gmail.com

ज्ञान महाविद्यालयामधील कौटुंबिक वातावरणाचा शोध घेणे.

महाविद्यालयामधील विद्यार्थ्यांची नेतृत्व क्षमता व भावनिक परिपक्वता यातील सहसंबंध अभ्यासणे.

### संशोधन निबंध परिकल्पना:-

महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची नेतृत्व क्षमता, भावनिक परिपक्वता आणि कौटुंबिक वातावरण यात सहसंबंध नाही.

### संशोधन पध्दतीची निवड:

प्रस्तुत संशोधन हे वर्तमान काळाशी संबंधित असल्यामुळे प्रस्तुत संशोधनासाठी सर्वेक्षण संशोधन पध्दतीची निवड करण्यात आली आहे .

### प्रस्तुत संशोधनातील नमुना निवड :

प्रस्तुत संशोधनासाठी यादुच्छिक पध्दतीने महाविद्यालयातील 150 विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली आहे. नमुना सुगम याद्दच्छिक पध्दतीने निवडण्यात आला आहे.

### संशोधनाची साधने :

प्रस्तुत संशोधनात चाचणी या साधनाचा अंवलब करण्यात आला आहे.

### संशोधन निबंध विषयाचे निष्कर्ष

नेतृत्व क्षमतेवर प्रभाव पाडणारे कौटुंबिक परिस्थिती संबंधित घटक तसेच भावनिक परिपक्वतेशी संबंधित घटक या दोन्ही बाजूंचा बारकाईने अभ्यास केल्यानंतर नेतृत्व क्षमता विकासातील अडथळे लक्षात येतात आणि त्या अडथळ्यांवर उपाययोजना करून नेतृत्व क्षमतेचा विकास योग्य दिशेने करता येतो.

उदारीकरण, खाजगीकरण, जागतिकीकरण आणि डिजिटलायझेशनच्या आगमनाने जगभरातील कंपन्यांचे स्वरूप आणि दृष्टीकोन बदलला आहे. आधुनिक IT, MNC, उद्योगांचे स्वरूप विकेंद्रीकरणाने संपन्न झाले आहे ज्यामध्ये खालच्या स्तरापासून उच्च स्तरापर्यंतचे नेते आहेत, उत्पादनाच्या विविध स्तरांवर सर्व कर्मचाऱ्यांसाठी निरोगी कामकाजाचे वातावरण निर्माण करण्यासाठी जबाबदार आहेत.

हे कर्मचारी स्थानिक भागातील आहेत, विविध सांस्कृतिक आणि भाषिक पार्श्वभूमीचे आहेत आणि कंपन्यांचे समान ध्येय साध्य करण्यासाठी प्रयत्नशील आहेत. सॉफ्ट स्किल्स कर्मचाऱ्यांना कामकाजाच्या वातावरणात एकमेकांशी संवाद साधण्यास, समजून घेण्यास आणि एकमेकांशी यशस्वीपणे संबंध ठेवण्यास मदत करतील. या सॉफ्ट स्किल्सचे संपादन, ताबा यामुळे कर्मचारी वैयक्तिक आणि व्यावसायिक विकासासह चांगले नेते बनतात. सॉफ्ट स्किल्स अद्वितीय आहेत कारण ती तांत्रिक किंवा मूर्त किंवा कठोर कौशल्यांसारखी मोजता येणारी नसतात आणि ती कामाच्या ठिकाणी दैनंदिन जीवनातील परिस्थितींकडे पाहण्याच्या आमच्या दृष्टिकोनातून विकसित केली जातात. 21 व्या शतकाच्या संदर्भात कर्मचाऱ्यांच्या यशासाठी सॉफ्ट स्किल्सचे महत्त्व आणि प्रभाव निश्चित केला. चा अभ्यास नेतृत्व क्षमता विकसित करण्याच्या गरजेवर भर देतो

त्यांच्या तांत्रिक क्षमतेसह व्यक्तिमत्व क्षेत्राशी संबंधित शोधात्मक अभ्यास, उद्योजकीय क्षमतेसाठी सॉफ्ट स्किल्स डेव्हलपमेंटचे महत्त्व तपासतो. सहभागींची रोजगार मिळविण्याची क्षमता वाढवण्याच्या उद्देशाने विद्यापीठातील विद्यार्थ्यांना ऑफर केली जाते. अभ्यासात असे दिसून आले आहे की सॉफ्ट स्किल्सच्या जागरुकतेमुळे सॉफ्ट स्किल्सचे ज्ञान नसलेल्या विद्यार्थ्यांच्या तुलनेत वैयक्तिक विद्यार्थ्यांना रोजगारासाठी अतिरिक्त धार मिळाली. या संदर्भात उच्च शैक्षणिक संस्थांनी विद्यार्थ्यांना त्यांच्या रोजगाराची पातळी वाढवण्यासाठी सॉफ्ट स्किलचे प्रशिक्षण देण्यासाठी व्यावहारिक दृष्टीकोन विकसित करणे आवश्यक आहे.

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter) Email:- ctefeduinspire@gmail.com

भावनांचा विकास हा शिशुच्या जीवनासांबतच चालु होतो आणि हा शिशु सहा वर्षाचा होईपर्यंत आपल्या भावनांच्या प्रती अत्यंत संवेदनशील राहतो.

## संशोधन निबंध शिफारशी

भावना आणि क्षमतांची जाणीव परिपक्वतेमध्ये महत्वाची भूमिका पार पाडते अशा स्थितीत भावनांवर नियंत्रण ठेवणे आणि आपल्या क्षतमांची आपणास पूर्ण जाणिव असणे शिवाय आपल्यामध्ये असलेल्या क्षमतानुसार अपेक्षा करणे परिपक्वतेमध्ये महत्वाचे आहे.

अहंकार, हिन भावना आणि दुस-याशी स्पर्धा करण्याची प्रवृती यावरुन व्यक्तीची परिपक्वता कितपत आहे हे दिसून येते. जेव्हा व्यक्तीला आपल्यामध्ये असलेल्या क्षमतेचा अहंकार येतो आणि इतरांबद्दल हिन भावना त्याच्यामध्ये निमार्ण होते तेव्हा त्या व्यक्तीमध्ये परिपक्वतेचा पुर्ण विकास झाला असे म्हणता येत नाही. शिवाय जिंकण्यासाठी स्पर्धात्मक मनोवृत्ती सुध्दा व्यक्तीमधील अपरिपक्तेला निर्देशित करते. परिपक्वतेसाठी व्यक्तीच्या वर्तनामध्ये अहंकार असता कामा नये दुस-याचा सन्मान प्रवृत्ती असावी.

परिपक्वतेसाठी आणखी एक पैलु म्हणजे सामाजिकीकरण होय ज्यासाठी प्रशिक्षण आणि सराव याची गरज असते.

भावनिक चिडचिडेपणा आणि आक्रमकता व्यक्तीमध्ये असणे आणि त्यामुळे क्रोध व्देष, क्रुरता निर्माण होते या बाबी परिपक्वतेसाठी लक्षणे आहेत. या बाबीचा व्यक्तीच्या वर्तन व्यवहारातील अभावाचा संबंध हा परिपक्वतेशी आहे.

परिपक्वता ही वास्तविकतेची एक सखोल जाणीव आहे. म्हणजे वास्तविक परिस्थितीला अनुसरुण व्यक्ती वर्तन करते कोणत्याही काल्पनिक स्तरावर व्यक्ती निर्णय घेत नाही किंवा वर्तन करित नाही तात्पर्य व्यक्तीला वास्तविकता काय आहे याची पुर्ण जाणीव असते आणि त्यानुसार तीचा व्यवहार असतो.परिपक्वतेचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे लवचिकता आणि अनुकुलनक्षमता होय परिपक्वता असलेल्या ह्या निर्माण होणा-या परिस्थितीशी समायोजन साधणा-या असतात जशी परिस्थिती असेल त्या नुसार त्या वागतांना दिसतात. मरण स्विकारेल पण वाकणार नाही अशी त्याची प्रवृती नसते.

## संदर्भ सूची

नानासाहेब कुऱ्हाडे.( २०२१). ऑनलाईन शिक्षण काळाची गरज. पुणे, जीवन शिक्षण. पृ.क्र. 201

के. म. भांडारकर " सुलभ शैक्षणिक संख्याशास्त्र ", पुणे : नित्य नूतन प्रकाशन, पृ.क्र. १५३

मनोज किल्लेदार. (२०१३).ई लर्निंग चे फायदे तोटे. पुणे, जीवन शिक्षण. पृ.क्र. 45

पूजा जैन. (२०१९). भारतातील प्राथमिक शिक्षण ई-प्रवेश उपक्रम. नवी दिल्ली, प्राथमिक शिक्षक. पृ.क्र. 254

हर्षानंद खोब्रागडे व डामरे गोकुळ. (२०१४). सुलभ शैक्षणिक संशोधन पद्धती,अमरावती, सुगम प्रकाशन. **पु.क्र** 12